दैनिक

लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : १३८ वा ▶ शनिवार दि. २३ मार्च २०२४ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ४

मुंबई, इंदौर, पुणे, अहमदाबाद, कोल्हापूर, नागपूर २X१ स्लिपर कोच AC व Non.AC

पार्सल सेवा व रिटर्न बुकिंग उपलब्ध

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे

२X२ सिटींग लक्झरी बस. शैक्षणिक सहलीकरिता व लग्न समारंभाकरिता बस योग्य दरात भाड्याने मिळेल.

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

न्यूज कॉलम

महापालिकेतर्फे ३१ मार्चपर्यंत शास्ती माफ

धुळे । महापालिकेने शहरातील विविध भागात व्यापारी संकुल बांधले आहे. या संकुलातील गाळे, जागा, ओटे व्यावसायिकांना भाडेतत्त्वावर देण्यात आले आहे. काही संकुलातील दुकानदारांनी भाडे थकवले आहे. त्यामुळे थकबाकीवर शास्तीची आकारणी केली जाते आहे. आता मनपाने थकबाकीवरील शास्ती माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा लाभ ३१ मार्चपर्यंत शंभर टक्के थकबाकी भरणाऱ्यांना मिळेल.

राजकीय पक्षांसाठी एक खिडकी योजना

धुळे । लोकसभा निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना प्रचार विषयक परवानगी घेणे सोईचे व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात एक खिडकी योजना कक्ष सुरू करण्यात जिल्हाधिकारी गोयल यांनी ही माहिती दिली. राजकीय पक्षांना प्रचार विषयक विविध परवानगी देण्यात एकसूत्रीपणा यावा यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

केजरीवालांच्या रिमांडवर सुनावणी

दिल्ली । मद्य धोरण प्रकरणी ईडीने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना राऊस एव्हेन्यू न्यायालयात हजर केले. त्याच्या कोठडीवर सुनावणी सुरू झाली आहे. तपास यंत्रणेने १० दिवसांची कोठडी मागितली आहे. दिल्ली दारू धोरण तयार करण्यात केजरीवाल यांचा थेट सहभाग असल्याचे ईडीने म्हटले आहे. रोख रक्कम दोनदा हस्तांतरित करण्यात आली.

मध्यप्रदेशातून गुजरातकडे जाणारा दारू साठा जप्त

४८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत शिरपूर तालुका पोलिसांची कारवाई

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मध्य प्रदेशातून अवैधरित्या गुजरातकडे दारू साठा नेणारा कंटेनर शिरपूर तालुका पोलिसांनी आज पकडला. २८ लाखांच्या दारू साठ्यासह ४८ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला, शिरपूर तालुका पोलिसांनी केलेले कारवाईचे स्वागत होत आहे.

पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना गोपनिय माहीती बातमी मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातील सेंधवा कडुन शिरपुर मार्गे गुजरात राज्यात कंटेनर मध्ये देशी-विदेशी दारुची अवैध वाहतुक होणार आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार हवालदार संतोष पाटील, संदिप ठाकरे, कैलास पवार, सुनिल पाठक, योगेश मोरे, संजय भोई, स्वप्नील बांगर, भुषण पाटील, मनोज पाटील यांनी शोध मोहीम सुरू केली. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर पळासनेर गावाजवळ लोकसभा निवडणुक २०२४ अनुशंगाने नाकाबंदी लावण्यात आली आहे. चेकपोस्टवर नाकाबंदी वाहने तपासणी करीत असतांना कंटेनर (एन ०१/ एजे ९२५२) येतांना दिसले. वाहनावरील चालकास वाहन थांबविण्याचा ईशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन थांबविले. वाहन चालक विजयकुमार प्रतापसिंग (वय ३२ वर्षे रा. नवा ता. राजगड, सादुलपुरजि. चुरु, राजस्थान), सहचालक प्रदिपकुमार मानसिंग (३३ वर्षे, रा. नवा) यांची चौकशी केली. वाहनात भरलेल्या मालाबाबत विचारपुस केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तरे दिले नाही. वाहनाची तपासणी केली असता त्यात खालील वर्णनाची देशी-विदेशी कंपनीची दारु मिळाली.

१७ लाख २८ हजार रुपये किमतीची समर स्पेशल वोडका १८० एम.एल.चे एकुण १२० खोके, ७ लाख ५ हजार ६०० रुपये किमतीची रशियन वोडका ७५० एम.एल.चे एकुण ४९ खोके, ४ लाख १५ हजार रुपये किमतीची मॅकडॉवेल नं. ०१, १८० एम.एल. चे एकुण १३१ खोके, २० लाख रुपये किमतीची टाटा कंपनीचे कंटेनर असा एकूण एकुण ४८ लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चालक वाहका विरुद्ध शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक श्रीराम पवार, हवालदार संतोष पाटील, संदिप ठाकरे, कैलास पवार, सुनिल पाठक, योगेश मोरे, संजय भोई, स्वप्नील बांगर, भुषण पाटील, कृष्णा पावरा, मनोज पाटील यांनी कारवाई केली. निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

४८ लाखाचा मुद्देमाल हस्तगत

पोलिसांनी कंटेनर थांबवत यात असलेल्या मालासंदर्भात चालकास विचारणा केली. मात्र चालकातर्फे उडवाउडवीचे उत्तरे मिळाल्यानंतर संबंधित कंटेनर पोलीस ठाण्यात आणण्यात आला. त्या ठिकाणी पंचांसमोर कंटेनरची संपूर्ण तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान कंटेनरमध्ये विविध नामांकित कंपन्यांच्या दारूचा साठा पोलिसांना आढळून आला आहे. जवळपास ४८ लाखाहून अधिकचा दारूसाठा पोलिसांनी यावेळी हस्तगत केला असून, या कारवाईत दोघा जणांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास शिरपूर तालुका पोलीस करीत आहेत.

नगावबारी परिसरातील युवक, महिलांचा भाजपात प्रवेश

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

लोकसभेच्या धुळे मतदारसंघाचे सलग दोन निवडणुकांपासून खासदार म्हणून नेतृत्व करणार्या डॉ. सुभाष भामरे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत नगावबारी परिसरातील शंभरावर कष्टकरी युवकांसह महिलांनी आज भाजपाच्या ज्येष्ठ नागरिक आघाडीचे देवपूर मंडळाध्यक्ष युवराज बोरसे व देवपूर मंडलाध्यक्ष सुबोध पाटील यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यावेळी खासदार डॉ. भामरे यांनी या सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले.

यावेळी खा. डॉ.सुभाष भामरे यांच्यासह भाजपचेमहानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, सुबोध पाटील, युवराज बोरसे, अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी युवराज बोरसे म्हणाले, की खासदार डॉ. भामरे यांनी गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात धुळे शहरासह पूर्ण मतदारसंघात केलेल्या विकासकामांमुळे प्रेरित होऊन तसेच नगावबारी परिसराच्या विकासासाठी परिसरातील कष्टकरी नागरिकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यात आगामी लोकसभा निवडणुकीत आपण प्रत्येकाने योगदान देत नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान बनविण्यासाठी खासदार डॉ. भामरे यांना विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. धुळे-नरडाणा रेल्वेमार्ग, शहरातील विविध भागांतील डीपी रस्त्यांसह कॉलन्यांमधील रस्ते, भूमिगत गटारी आदी कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला. आपल्या नगाव परिसराच्या विकासासाठीही आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही देखीलभामरे यांनी यावेळी दिली.

आम आदमी पक्षाचे धुळ्यात आंदोलन

मुख्यमंत्री केजरीवालांचे अटकेचा निषेध

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना इडीने केलेल्या अटकेच्या निषेधार्थ धुळ्यात आमआदमी पक्षाने निषेध आंदोलन केले आहे.

भाजपच्या इशार्यावर चालणार्या ईडीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन न करता सुडबुध्दीने अरविंद केजरीवालांना अटक केली. कालचा दिवस हा लोकशाहीतील काळा दिवस म्हणता येईल. एकीकडे लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असताना, संपूर्ण देशात आचारसंहिता लागू असताना आपने निवडणुकीत भाग घेवू नये या हेतूने ईडीचा वापर करुन आपला रोखण्यासाठी केजरीवालांना अटक करण्यात आली आहे. ईडी, सीबीआय, कोर्ट, सीआयडी, इनकम टॅक्ट यांना भाजप आपल्या इशार्यावर नाचवीत आहे. ही देशासाठी धोक्याची घंटा असल्याचे हितेंद्र पवार यांनी म्हटले आहे. या निषेध आंदोलनात हितेंद्र पवार,नामदेव मोरे, ॲड. विनोद चौधरी,राजेंद्र खैरनार,ललीत पाटील, डॉ.संदीप पाटील, ललीत पाटील आदी उपस्थित होते.

नाट्यजागर महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी शशिकांत नागरे यांची निवड

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

अखिल भारतीय नाट्य परिषदेला शंभर वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने गेल्या तीन महिन्यापासून महाराष्ट्रभर नाट्य जागर हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमात महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या नाट्यप्रकारांचे प्राथमिक फेरी घेण्यात आली. यामध्ये निवड झालेल्या कलाकारांचे पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर या चार केंद्रावर झालेल्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरली आणि उपांत्य फेरीतून अंतिम फेरीसाठी कलाकारांची निवड करण्यात आली.

यामध्ये धुळे येथील मॅड स्टुडिओचे कलाकार शशिकांत नागरे यांची नाशिक, नंदुरबार, जळगाव, धुळे चार जिल्ह्यातून फेरीसाठी निवड झालेली आहे. प्राथमिक फेरीत प्रथम क्रमांक पटकावला व उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत. दि ९ मे रोजी अहमदनगर केंद्रावर उपांत्य फेरी पार पडली. त्यातून १३, १४ एप्रिल रोजी मुंबई यशवंत नाट्यमंदिर माटुंगा येथे होणाऱ्या नाट्यजागर महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी निवड झालेली आहे.

जैताणे गावातील भाजीपाला मार्केटला नवीन जागा द्या!

शेतकरी व व्यापाऱ्यांची मागणी

जैताणे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आजुबाजुच्या खेड्यापाड्यातून तसेच जैताणे, निजामपुर शिवारातुन मोठ्या प्रमाणात शेतमाल येत असतो. तसेच शेतकरी व व्यापारी यांचीही गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अश्यातच जे पूर्वीचे जुने भाजीपाला मार्केट होते ते २ वर्षांपूर्वी नविन बनवण्यासाठी पाडण्यात आले. आणि आजही ते त्याच परिस्थितीत आहे. सध्या भाजीपाला लिलावसाठी सरकारी गुरांचा दवाखान्यात मार्केट चालू आहे. पण कमी जागा असल्या कारणाने खुपच चेंगराचेंगरी होते. परिणामी व्यापारी जास्त फिरत नसल्याने शेतमाल पाहीजे त्या भावात विकला जात नाही. शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. म्हणून येथील शेतकरी नाराज आहेत. तसेच जे मोठी वाहने आहे. टरबूज, डांगर चे ट्रॅक्टर यांचा लिलाव बाहेरच भर रस्त्यात केला जातो. परिणामी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. जैताणे ग्रामपंचायत ने लवकरात लवकर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मैदानात भाजीपाला मार्केट स्थलांतरित करावे अशी सर्व शेतकरीवर्ग व व्यापाऱ्यांनी केली आहे.

गोदान एक्सप्रेसच्या पार्सल बोगीला लागली आग

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

नाशिक रेल्वे स्थानकातुन भुसावळकडे जाणाऱ्या गोदान एक्सप्रेसच्या पार्सल बोगीला आग लागली. गाडी थांबवून बोगीची आग वेळीच विझवण्यात आली त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

मुबंई लोकमान्य टिळक टर्मिनस वरून -गोरखपूरला जाणारी गोदान एक्सप्रेस आज दुपारी नेहमी प्रमाणे नाशिकरोड रेल्वे स्थानकात आली. स्थानक सोडल्या नंतर गोरेवाडी नजीक, मनपाच्या जलशुद्धकरण केंद्रा जवळून गोदान एक्सप्रेस जात असतांना गाडीच्या मागील पार्सल बोगी मधून धुराचे

लोट बाहेर येऊ लागले. काही क्षणांतच वाऱ्यामुळे बोगीमधून धुरा बरोबर अगीचे लोट येऊ लागले. सदर बाब शेजारील बोगी मधील प्रवासींच्या लक्षात आल्याने त्यांनी आरडाओरड केली. त्यानंतर गाडीच्या गार्डला समाजल्य नंतर त्यांनी तत्काळ गाडी थांबवण्याचा निर्णय घेतला. गाडी थांबताच प्रवाशांनी चालत्या गाडीतून उड्या मारल्या. तत्काळ अग्निशामक दलाला कळवण्यात आले, तोपर्यंत रेल्वे कर्मचारी यांनी फोमच्या सहाय्याने आग विझावण्याचा प्रयत्न केला मात्र आग आटोक्यात येत नव्हती. स्थानक प्रबंधक श्रीवास्तव, रेल्वे सुरक्षा दलाचे पोलीस निरीक्षक हरफूलसिंह यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश सोननसे, लोहमार्ग पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी, पोलीस हवालदार संतोष उफाडे पाटील, कुलकर्णी आप्पा, आदिसह अधिकारी कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. बाधित बोगीमध्ये कशाने आग लागली हे मात्र स्पष्ट झाले नाही.

अखेर सिटीलिंक वाहकांच्या संपावर सकारात्मक तोडगा

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकच्या तपोवन येथील वाहकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी पुकारलेला संप अखेर मागे घेण्यात आला आहे. त्यामुळे नाशिककरांची जीवनवाहिनी असलेली सिटीलिंक आता पुन्हा एकदा नाशिकच्या रस्त्यांवर धावणार आहे. हा संप मिटल्याने काल शुक्रवारी सायंकाळपासूनच बससेवा सुरू होणार असली तरी आज शनिवार दि. २३ मार्चपासून पूर्ण क्षमतेने बसेस रस्त्यावर धावणार आहेत.

तपोवन डेपो येथील बसेसना वाहक पुरविण्याचा ठेका मे. मॅक्स डिटेक्टिवव्ह अँड सिक्युरिटी या कंपनीला देण्यात आलेला आहे. आपल्या विविध मागण्यांसाठी या कंपनीच्या वाहकांनी गुरुवार दि. १४ मार्चपासून संप पुकारला होता. नियमित वेतन, पीएफ, ईएसआयसी व रजेचे पैसे अकाऊंटला जमा करणे, इंक्रिमेंट, बोनस अशा विविध मागण्यासाठी हा संप पुकारण्यात आला होता.

काल शुक्रवार२२ रोजी सिटीलिंकचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप चौधरी, मुख्य महाव्यवस्थापक बाजीराव माळी, एजन्सीचे प्रतिनिधी व वाहक प्रतिनिधी यांची बैठक पार पडली. वाहकांच्या संप मागे घेण्याच्या निर्णयामुळे आता नाशिककरांची जीवनवाहिनी असलेली सिटीलिंक बस ९ दिवसांनंतर आता पुन्हा एकदा नाशिकच्या रस्त्यांवर धावणार आहे. तपोवन डेपो येथील बसेस सायंकाळीच सुरू होणार असल्या तरी आजपासून पूर्ण क्षमतेने बसेस रस्त्यावर धावणार आहेत. वाहकांच्या संपामुळे गेले ९ दिवस प्रवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागल्याने त्याबद्दल सिटीलिंक प्रशासनाने सर्व प्रवाशांची दिलगीरी व्यक्त केली आहे. तसेच बससेवा नियमित सुरू होत असल्याने प्रवाशांनी या बससेवेचा लाभ घ्यावा. असे आवाहन सिटीलिंक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पत्रकारांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या बदलीची मागणी

इंदिरानगर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

बांधकाम साइटवर शॉक लागून मृत्यू तर दुसरा एक गंभीर जखमी झाल्याचा प्रकार नुकताच इंदिरानगर भागात घडला. या घटनेची माहिती घेण्यासाठी गेलेल्या एका पत्रकाराला वरिष्ठ पोलीस निरीक्षकाकडून केबिनच्या आतमध्ये जाण्या अगोदरच अरेरावी तसेच अपमानास्पद वागणूक देण्यात आली. ही काय धर्मशाळा आहे का? माझ्या केबिनमध्ये कसे काय येतात? असे म्हणत माध्यम प्रतिनिधींचा अपमान करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक शरमाळे यांच्या बदलीची मागणी पत्रकार संघाकडून करण्यात आलेली आहे.

इंदिरानगर पोलीस ठाणे हद्दीत इमारतीचे काम सुरू असताना विजेचा धक्का लागून एका कामगाराचा हकनाक मृत्यू झाल्याच्या घटने संदर्भात माहिती घेण्यासाठी माध्यम प्रतिनिधी भाई सोनार हे इंदिरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक शरमाळे यांच्याकडे गेले. तसेच पोलीस निरीक्षकाकडे जाण्यापूर्वी ठाणे अंमलदार तसेच संबंधित तपासी अंमलदाराकडे या घटनेची माहिती विचारली असता त्यांनी टाळाटाळ केली. तसेच संबंधित प्रकरणाबाबत वरिष्ठ निरीक्षकांना जाऊन विचारा असे सांगितले. यावेळी माध्यम प्रतिनिधी पोलीस निरीक्षकांच्या केबिनमध्ये पाय ठेवताच ही काय धर्मशाळा आहे का? गेट आउट! कोणीही येतं कोणीही जात! अस म्हणत या घटनेची माहिती देण्यास टाळाटाळ करीत माध्यम प्रतिनिधींचा अपमान केला.

वातावरण तापू लागले : पक्षांपेक्षा कार्यकर्त्यांनाच उमेदवारीची चिंता

लोकसभा निवडणूक आत्ता कुठे जाहीर झाली असली, तरी गावगाड्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. पारा-पारांवर इलेक्शनच्या चर्चा झोडल्या जात असून महायुती व महाविका आघाडीचे जागावाटप कसे होणार? उमेदवार कोण असणार? बंडखोरी होणार का? असे अनेक प्रश्न या बेरक्यांना सतावत असून उमेदवारी नक्की कुणाला मिळणार? याची चिंता राजकीय पक्षांऐवजी उराला वाळू लावून घेतलेल्या कार्यकर्त्यांनाच जास्त लागून राहिल्याचे चित्र आहे. निवडणुकीच्या आखाड्यात आता नव्याने रंग भरणार असून उमेदवार निश्चितीनंतर 'आर या पार' पवित्रा घेऊन एकमेकांची जिरवाजिवी होणार असली तरी होळीच्या अगोदरच कार्यकर्त्यांची मात्र राजकीय धुलवड सध्या सुरू झाली आहे.

आचारसंहिता कडक हाय; तोलून मापून बोला

या इलेक्शनसाठी कधी नव्हे तो आचारसंहितेचे नियम न मोडण्याचाच अनेकांचा होरा असून काही तरी बोलून गोत्यात येण्यापेक्षा अनेकजण तोलून मापून बोलण्याकडेच भर देणार आहेत. ही निवडणूक अगदी रंगात येणार असून कोणत्या इलाख्यातून यावेळी कोण बाजी मारतो याचे आखाडे बांधले जाणार आहेत. सोशल मीडियावरही निवडणूक अधिकाऱ्यांची करडी नजर राहणार असल्याने नेतेमंडळींनाच नव्हे तर कार्यकर्ते व नेटकऱ्यांनाही आता भान ठेवावे लागणार आहे.

ऐन उन्हाळ्यात लोकसभा निवडणुका होत असल्यामुळे विविध पक्षांच्या उमेदवारांपुढे मतदारापर्यंत पोहोचण्याचे आव्हान राहणार आहे. उमेदवारी निश्चित झाल्यानंतर त्यांना प्रचारासाठी भिरकीट करताना घाम फुटणार आहे.. प्रखर उन्हाच्या तडाख्यामुळे प्रचाराला फटका बसणार असून उमेदवार सकाळी व दुपारनंतर प्रचार करतानाचे चित्र दिसणार आहे. प्रचारासाठी उमेदवारांसह कार्यकर्ते मतदारांच्या घरापर्यंत पोहोचणार आहेत. सध्या रब्बी हंगामाची काढणी सुरु आल्यामुळे शेतकरी शेतीकामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उमेदवार दारात अन शेतकरी शेतात असल्याचे चित्र यावेळी दिसणार आहे.निरस वाटणारी लोकसभा निवडणूक यंदा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसारखीच सोशल मीडिया, फेसबुकच्या माध्यमातून गावागावांत, वाड्यावस्त्यांवर इलेक्शनचं वारं दिसत आहे. त्यामुळे मागील काही दशके काहिशी निरस वाटणारी लोकसभा निवडणूक यंदा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीइतकी महत्वाची ठरु लागल्याचेच दिसू लागले आहे. महागाई, भ्रष्टाचार, वाढती बेरोजगारी, विविध नागरी समस्या, वाढते शहरीकरण या सर्वांचा परिणाम यंदाच्या निवडणुकीमध्ये दिसून येणार आहे.

शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

सर्वत्र निवडणुकीचीच चर्चा

या लोकसभा निवढणुकीत कमालीची बदललेली राजकीय समीकरणे, आरोप-प्रत्यारोपांमुळे ग्रामीण भागातील वातावरण उमेदवार जाहीर होण्याच्या अगोदरच ढवळून निघाले आहे. प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता अंग झाडून कामाला लागला आहे. पारावर तसेच चौकाचौकात व कट्ट्याकट्यावर सर्वत्र निवडणुकीचीच चर्चा सुरू झाली आहे.

गेटेड बंधाऱ्याच्या कामाला न्याहळोद येथे सुरवात

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथील गेटेड सिमेंट काँक्रिट बंधारा बांधकामाला नुकतीच शासकीय मान्यता मिळाली आहे. या बंधाऱ्यामुळे हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, पाया खोदण्याचे काम जोरात सुरू आहे. न्याहळोद परिसरातील जिव्हाळ्याचा विषय आईजोगाईलगत पांझरा नदीपात्रात १६ कोटी सात लाख साठ हजार ६०३ रुपये रुपयांच्या बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यानंतर आता बंधाऱ्याचा पाया खोदकामास सुरवात करण्यात आली आहे.

या कामामुळे गावालगतच्या सिंचनाचा प्रश्न व नदीपात्रात असलेल्या दहा ते बारा गावांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे; त्यात न्याहाळोदसह नगाव, धनूर, बिलाडी, सातारने, मोहाडी, कौठळ, तामसवाडी, विश्वनाथ, सुकवड आदी गावांना न्याहळोद नदीपात्रातूनच पाणीपुरवठा होत असतो. मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्राच्या पत्रानुसार गेटेड सिमेंट बंधारा योजनेत ९८ सघमी पाणीसाठा होणार असून, हजारो हेक्टर शेतीला याचा फायदा होणार आहे. प्रकल्पासाठी अधीक्षक अभियंता व जलसंधारण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

गरज आक्रमकतेची

काँग्रेस व अन्य पक्षांतून भाजपत नेते जात आहेत असे नाही तर भाजपमधूनही काँग्रेसमध्ये नेते येत आहेत. यास जोरदार प्रसिद्धी देणे व प्रचार अधिक आक्रमकपणे करणे यावर काँग्रेसने भर दिला पाहिजे.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. महाराष्ट्रातील रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर व चंद्रपूर या पाच मतदार संघात दि.१९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत सुमारे ५० उमेदवार निश्चित झाल्याची बातमी आहे. त्यात महाराष्ट्रातील सात उमेदवार असल्याचे 'कळते'. राज्यातील १४ उमेदवार पक्षाने निश्चित केल्याचे अन्य एका बातमीत म्हटले आहे. राज्यात काँग्रेस एकटा नाही तर 'महाविकास आघाडी'चा घटक आहे. या आघाडीची एक बैठक राष्ट्रवादी पक्षाच्या शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल आयोजित केली होती. त्यात काही मतदार संघ व उमेदवार यांच्यावर चर्चा होणे अपेक्षित होते. जाहीर झालेल्या वृत्तांमध्येही एकाच मतदार संघासाठी वेगवेगळी नावे दिली गेली आहेत. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने राज्यात चंद्रपूर ही एकमेव जागा जिंकली होती. तेथून सुरेश तथा बाळू धानोरकर यांनी विजय मिळवला होता. त्यांचे गेल्या वर्षी अचानक निधन झाले. त्या मतदार संघातून त्यांच्या पत्नी प्रतिभा यांना उमेदवारी मिळणार असल्याचे एका बातमीत म्हटले आहे, तर दुसर्या वृत्तपत्राने या मतदार संघासाठी विजय वडेट्टीवार यांचे नाव निश्चित झाल्याचे म्हटले आहे. हा संभ्रम पक्षासाठी योग्य नाही.

आर्थिक कोंडी

माजी केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर मतदार संघात काँग्रेसचे अनेक वेळा प्रतिनिधित्व केले आहे. आता तेथे त्यांच्या कन्या प्रणिती यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. सुशील कुमार यांचे नाव व त्यांचे कार्य यांचा फायदा प्रणिती यांना होईल. काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांना भंडारा-गोंदियामधून उमेदवारी मिळणे जवळपास नक्की आहे. २०१४ मध्ये त्यांनी याच मतदारसंघातून विजय मिळवला होता; पण तेव्हा ते भारतीय जनता पक्षातर्फे लढले होते. इतर मागास वर्गातील ते एक प्रभावी नेते आहेत. ही जागा पुन्हा जिंकण्याचे आव्हान पटोले यांच्या समोर आहे. काँग्रेसचे नागपूर शहर अध्यक्ष विकास ठाकरे यांना या मतदार संघातून उमेदवारी दिली जाणार आहे. त्यांच्या समोर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आव्हान असणार आहे. गडचिरोली-चिमूरमधून पक्षाने नामदेव उसेंदी यांना पक्षाने संधी दिली आहे. महाविकास आघाडीतील अन्य घटक पक्षांबरोबर चर्चा झाल्यानंतर रामटेकचा उमेदवार ठरेल असे दिसते. ही जागा गेल्या वेळी एकत्रित शिवसेनेने जिंकली होती. आता शिवसेनेत फूट पडल्याने या जागेवर चुरस निर्माण झाली आहे. पुणे लोकसभा मतदार संघावर समाजवादी विचारांचे पक्ष व नंतर काँग्रेसचे अनेक वर्षे वर्चस्व होते. गेल्या निवडणुकीत भाजपचे गिरीश बापट यांनी तेथे विजय मिळवला. आता पुण्यातून काँग्रेसने रविंद्र धंगेकर यांचे नाव निश्चित केल्याचे वृत्त लक्षवेधी आहे. विधानसभेच्या कसबा मतदार संघात झालेल्या पोटनिवडणुकीत धंगेकर यांनी भाजपचा पराभव केला होता. त्यामुळे त्यांना लोकप्रियता मिळाली; मात्र लोकसभा निवडणुकीचे आव्हान अवघड आहे हेही मान्य केले पाहिजे. इंडिया आघाडी व राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रांमुळे पक्षात उत्साह आहे; पण पक्षाला साधन सामग्रीची चणचण जाणवत आहे. पक्षाच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी हाच मुद्दा नवी दिल्लीत झालेल्या पत्रकार परिषदेत मांडला. काँग्रेसची खाती गोठवणे, प्राप्तिकर वसुलीची नोटीस देणे अशा कारवाईतून मोदी सरकार काँग्रेसला आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनवू पाहात आहे असे त्या म्हणाल्या आहेत. सत्तेविरुद्ध लढताना अशा अडचणी अपेक्षितच आहेत. त्यावर मात करण्यासाठी काँग्रेसने इंडिया आघाडीतील मित्रपक्षांशी अधिक समन्वय ठेवणे आवश्यक आहे. त्यांच्यामुळे जागा वाटप थांबले आहे असे चित्र निर्माण होणे किंवा उमेदवारांची अधिकृत घोषणा न होणे यामुळे संभ्रम वाढेल. राहुल यांच्या यात्रा व त्यांना मित्रपक्षांनी दिलेला पाठिंबा यामुळे देशात व राज्यात सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. त्याचा फायदा काँग्रेसने घेतला पाहिजे. त्यासाठी अधिक आक्रमक पवित्रा स्वीकारला पाहिजे.

कवितेच्या प्रांगणातील दरवळ

जागतिक कविता दिवस म्हणजे २१ मार्च. युनेस्को (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन) या संस्थेच्या वतीने १९९९ मध्ये काव्यात्मक अभिव्यक्तीद्वारे भाषिक विविधतेचे समर्थन करणे व लुप्त होत चाललेल्या भाषांना पुन्हा ऊर्जितावस्था निर्माण करून देणे या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. साहित्यातील काव्य हा प्रकार सर्वश्रेष्ठ मानला जातो, कारण पुरातन काळापासून साहित्य हे काव्याच्या द्वारे रसिकांपर्यंत पोहोचले आहे. रामायण, महाभारत, वेद, पुराणे ही सर्व काव्यरूपात लिहिली गेलेली आहेत.

जगभरातील कविता वाचक, कवी, प्रकाशन आणि अध्यापनाला प्रोत्साहन देणे आणि मूळ युनेस्कोच्या घोषणेनुसार, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय काव्य चळवळीला नवीन ओळख आणि प्रेरणा देणे हा त्याचा उद्देश आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये कवितेच्या प्रांगणात मुशाफिरी करताना अनेक अनुभवांनी जीवन समृद्ध झाले आणि कविता ही माझ्या अंतरात्म्याचा आवाज बनली. पाहता पाहता ५०० पेक्षा जास्त कविता हातून लिहिल्या गेल्या आणि नऊ काव्यसंग्रह प्रकाशित झाले. त्यामुळेच की काय, मला अनेक जण म्हणतात, तू हाडाची कवयित्री आहेस.

शाळेच्या बाकावर बसून अभ्यासक्रमातील पाठ केलेल्या कविता आजही जशाच्या तशा आठवतात आणि उत्स्फूर्तपणे आपसूकच ओठांमधून बाहेर पडतात. ज्येष्ठ श्रेष्ठ कवी मर्ढेकर, केशवसुत, बा. भ. बोरकर, इंदिरा संत, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, शांता शेळके

अशा कितीतरी कवींच्या कवितांनी मनावर गारुड केले. बहिणाबाईंच्या अहिराणी बोलीतील अंगभूत लय असलेल्या कविता ऐकताना मन उल्हासित होतं.

येरे येरे पावसा, नाच रे मोरा, टप टप पडती अंगावरती, गवतफुला या कवितांनी तर अक्षरशः वेड लावलं आणि बालपणातील एक आनंदाचा ठेवा म्हणून या कविता मनाच्या अंगणात कायमच रेंगाळत राहिल्या. जरा मोठी झाल्यानंतर ओळख झाली ती बालकवींच्या श्रावणमासी, औदुंबर, कुसुमाग्रजांच्या स्वप्नाची समाप्ती, पृथ्वीचे प्रेमगीत, कणा, शांताबाईंची पैठणी या कविता अगदी जीवाभावाच्या झाल्या. याच कवितेच्या पाऊलखुणा माझ्या नव्या कवितेच्या प्रांगणात जाणवू लागल्या आणि सहजच कल्पनेला प्रतिमांचा नवा साज मिळाला. अलंकाराने कवितेचे भावविश्व सजले आणि एका एका कवितेतून जगण्याचं प्रतिबिंब कवितेतून अधोरेखित होऊ लागलं तेव्हा माझी प्रिय सखी कविता झाली असं म्हणतात कविता ही विजेसारखी आहे. याचा प्रत्यय माझ्या पुढील ओळींमधून जाणवेल.

ऊर चिरत नभाचा जशी वीज कोसळावी
तशी भेट वेदनेची शब्दांतून मला व्हावी
तप्त शब्दांचे निखारे ओघळत गाली यावे
कवितेत कोरताना निखाऱ्याचे मोती व्हावे

कवितेचे शब्द जेव्हा कोऱ्या पानावर उमटतात तेव्हा कवितेची सुरेख लेणी तयार होते आणि त्या कवितेचा आनंद हा सर्वश्रेष्ठ आनंद असतो. मी जेव्हा कविता लिहीत असते तेव्हा सर्व जगाचा विसर पडलेला असतो. ही सृजनाची प्रक्रिया किती सुखकारक असते, ते नाही सांगता येणार. हे मात्र खरं कवितेची प्रक्रिया ही जीवघेणी असते. मनाच्या अंगणात शब्द घिरट्या घेऊ लागतात तेव्हा मन सैरभैर होतं. मनाची ती अवस्था कविता लिहायला भाग पाडते. एक - दोन ओळी सहजच येतात आणि मग पुढच्या ओळी काय येतील याचाही अंदाज आम्हा कवींना लागत नाही. कविता ही कवीला मिळालेली दैवी देणगी आहे. सरस्वतीचा वरदहस्त असल्याशिवाय सिद्धहस्त कवी होऊ शकत नाही, असे मला वाटते. कविता ही ओढून-ताणून कोणीतरी लिही म्हटलं की लिहिण्याची गोष्ट नाही. तिला हवं तेव्हा ती येते आणि तिचं रूप धारण करते. मला एका मित्राने एकदा म्हटलं या विषयावर तू कविता लिही, त्या वेळेला कविता जन्माला आली आणि याचे उत्तरही कवितेतूनच मिळाले. ते असे.

तुला काय होतं कविता लिही म्हणायला
कविता लिहिताना काळीज तळहातावर
ठेवावं लागतं
आंजारून गोंजारून वेदनांना आपलंसं करावं लागतं
तेव्हा कुठं कागदावर उतरते कविता
आणि असं करता करता एक दिवस जगण्याची होऊन जाते कविता
तेव्हा मग श्वासात जाणवते कविता
अन् कवितेत जागतो श्वास
वास्तवाच्या बीजातही दरवळतो
भासांचा अनामिक सुहास
स्पंदनात मनाच्या अस्वस्थ
शब्द नवे भिरभिरत येती
झोपल्या संवेदनांना तेच
हाका मारुनी जागे करिती
भाव वेड्या मनास मग
शब्द लाघवी घालती उखाणे
शब्दांचीच होते कविता
अन् कवितेत सामावते जगणे

शेवटी जाता जाता एवढेच सांगेन की, उत्तम कविता ही तीच असते ज्या कवितेमध्ये आशय समृद्ध असतो. जी कविता परत परत वाचावीशी वाटते ती कविता सर्वांत सुंदर असते, असे मला वाटते. म्हणूनच मी म्हणेन कवितेकडे इतकं सहज पाहू नका. तिला समजून उमजून तिचं काळजाच्या कुपीत जतन करा. कवितेचे दान माझ्या पदरात टाकलेल्या त्या ईश्वराचे मी आभार मानते आणि काव्य दिनाच्या निमित्ताने मी माझ्या वाचकांचे ऋण व्यक्त करते.

- लता गुठे, विलेपार्ले

आचारसंहितेचा बागुलबुवा नको!

लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला. दि. १६ मार्चला दुपारी ३ वाजल्यापासून भारत देशभरात आचारसंहिता लागू झाली. निवडणुका सुरळीत आणि नियम, कायदे यांचे पालन करत झाल्या पाहिजेत. त्यासाठी आचारसंहिता असायलाच पाहिजे. सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवाराचा प्रचार करताना, प्रचार यंत्रणा राबवताना काय करावे आणि काय करू नये, कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत, याची एक संहिता निवडणूक आयोगाकडून जारी केली आहे. या निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या चौकटीप्रमाणेच उमेदवार आणि त्यांच्या पक्षाने प्रचार यंत्रणा राबवणे अपेक्षित आहे. त्याच तंतोतंत पालन होत असत. कायद्याची चौकट पाळूनच प्रचार यंत्रणा कार्यरत राहते. त्यात कुणाला काही गैर वाटल तर तक्रारही केली जाते. तशा तक्रारीही होतात. या तक्रारींची दखल निवडणूक विभागाकडून घेतली जाते. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष निवडणुकीशी संबंधित आहेत. त्याबद्धल कोणाचही दुमत नाही.

निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्वच बाबतीत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व कामकाज पार पडलच पाहिजे. संबंधित अधिकारीही त्यासाठी सतर्क राहून कार्यरत असतात; परंतु आचारसंहिता जाहीर झाली की त्याचा परिणाम विकास प्रक्रियेवर होऊ देता कामा नये. बऱ्याचवेळा या आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामेच थांबवली जातात. दुर्दैवाने यावेळी कोकणातील निवडणुका ७ मेपर्यंत चालणार आहेत. कोकणातील वातावरणाचा विचार करता मार्च, एप्रिल, मे हे तीन महिने रस्ते, पाटबंधारे आणि बांधकामांसाठी अधिक महत्त्वाचा कालावधी आहे. याच कालावधीत रस्ते बांधकाम पूर्ण केली जातात. सर्वसाधारणपणे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाला सुरुवात होते. अर्थात गेल्या दोन-पाच वर्षांत पाऊस केव्हाही कोसळतो. अशा बदललेल्या वातावरणाचा परिणाम केवळ भाजीपाला, फळपिकांवरच होतो असे नाही, तर त्याचा परिणाम विकास प्रक्रियेवरही होत असतो.

काहीवेळा काय घडतं की, आचारसंहिता जाहीर झाली की काही अधिकारी कोणत कामच करत नाहीत. कोणत्याही विकासकामांचा विषय आला की आचारसंहितेचे कारण पुढे केले जाते. ज्या विकासकामांशी आचारसंहितेचा काहीही संबंध नसतो, त्याबाबतीत आचारसंहिता असल्यामुळे काम करता येत नाही, असे सांगणारे कामचुकारही प्रशासनात आहेतच! वास्तविक आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच जर सर्व तांत्रिक व प्रशासकीय पातळीवरील कागदपत्रांची पूर्तता केलेली असेल, तर आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामे थांबवण्याचे कोणतही कारण नाही. आचारसंहिता जाहीर झाल्यावर नवीन प्रस्तावांना मंजुरी, उद्घाटन आदी बाबतीत वेगळ धोरण आहे; परंतु खरोखरीच ज्यांना कामचुकारपणा करायचा आहे, ज्यांच्यामध्ये प्रशासकीय कामकाजातील नकारात्मकता ठासून भरलेली आहे, प्रशासनातील नकारात्मकता जपणारे अधिकारी याच आचारसंहितेविषयी उगाचच अर्थ-अन्वयार्थ शोधून काहीच काम न करण्याच्या मानसिकतेत असतात.

आचारसंहितेचे तंतोतंत पालन व्हायलाच पाहिजे आणि त्याचबरोबर आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामांवरही त्याचा परिणाम होता कामा नये, हे देखील पाहिले पाहिजे; परंतु निवडणुका जाहीर झाल्या की साहजिकच आचारसंहिता आली. आचारसंहिता जारी झाली की, विकासप्रक्रिया थांबली हे घडू नये, अशी अपेक्षा आहे. याच कारण जी काम सध्या सुरू आहेत ती अधिक गतिमान करून लवकरात लवकर पूर्ण कशी होतील, हे पाहिले पाहिजे. याच कारण जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबरपर्यंत म्हणजे पाच महिने बांधकामांशी संबंधित सर्वच काम थांबलेली असतात. यामुळेच तसे नियोजन कोकणात या सर्वांचा विचार करून केलेले असेलच त्याबद्धल प्रश्नच नाही; परंतु यापूर्वीचा पूर्वानुभव हा आचारसंहिता जारी झाली की विकासकामांची केवळ गती मंदावत नाही, तर कोणत्याही विकासकामांच्या बाबतीत तोच दृष्टिकोन ठेऊन पाहिले जाते. अर्थात जसा अधिकाऱ्यांच्या नकारात्मकतेचा दोष आहे त्याचप्रमाणे नागरिक, ग्रामस्थही सकारात्मक विचार करताना दिसत नाहीत.

पूर्वी मंजूर असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली कामेही का सुरू केली? असा उलटा प्रश्न विचारणारे ग्रामस्थ असतात. काही वेळा अधिकाऱ्यांनी एखाद पूर्वीच मंजूर असलेले काम जरी त्यांच्या पातळीवर सुरू करण्यात आले, तरीही त्याला विरोध करणारे काही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते असतात. असे कार्यकर्ते फक्त राजकारण करायचं म्हणून प्रयत्न करतात; परंतु त्याचा विकासकामांवर किती आणि कसा परिणाम होऊ शकतो याचा विचारही होत नसतो. या सर्वांमध्ये आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होत असताना त्याचा विकास प्रक्रियेवर कोणताही परिणाम होणार नाही, याची काळजी घेतली जावी.

- संतोष वायंगणकर

शब्दकोडे-३५६



आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा ४. फायदेशीर, हितावह ७. अवाजवी १०. संगीतातील एक राग १२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना १४. मला १५. रसाने भरलेले, उदा.वर्णन १८. लबाडीचा हेतू १९. राबता, जाणे-येणे २१. मऊ २२. सद्वर्तन २३. पळसाच्या पानांची संख्या २४. बेकरीतील एक पदार्थ २५. लेखणी २७. उद्याच्या नंतरचा दिवस २८. नेभळट मनुष्य ३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!' ३२. एक चर्मवाद्य ३३. वांग्याचा खमंग पदार्थ ३४. तलमसुती कापड ३६. हिंमत, धैर्य ३८. गावातील गप्पाष्टकाची जागा ३९. छोटी बैलगाडी ४१. जन्म ४२. चिनीमातीची वाटी ४२अ. घरटे (संस्कृत) ४४. पत्नी ४५. फणसातील खाद्यभाग ४६. च्या शिवाय ४८. दरवाजा ४९. चंद्र ५०. तबकातील या शुभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते ५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत ५४. समाचार ५५. भांडण ५६. नमस्कार ५७. नवे कोरे ५९. कमळ ६१. बासरी ६२. कोलकाताचे विमानतळ ६४. व्रत ६७. टाळ्यांचा आवाज ६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव ६९. प्रज्वलित, तापलेले

उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र २. महाभारताचे मूळ नाव ३. मृत्यूदेवता ५. लवकर, वेगाने ६. बशीचा जोडीदार ७. अभिनेता ८. चणचण ९. अखबार ११. पुरुष १३. चाणक्यनीती १४. वर्षाचा बारवा भाग १६. एक मंगलवाद्य १७. वीस दस्ते कागद १९अ. संक्रांतीचे दान २०. रोखलेली नजर २२. मनाला टोचणारे दु:ख २५. व्यायाम, परेड २६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना २७. पुन्हापुन्हा २८. माळेतील मधला मोठा मणी २९. दिल्लीचे विमानतळ ३१. निषिद्ध, त्यागलेले ३५. नव्वद अंशाच्या आतील कोन ३६. महासर्प ३७. सिंहाची उपाधी ३८. बसण्याची फळी ४०. झकास, छान ४२. अनाथच्या विरुद्ध ४३. धडक ४४. पोते ४६. गणपतीचे एक नाव ४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा ४८. राजा-राणीची सेविका ५२. लाट, झटका, हुक्की ५३. एकूण एक सर्व ५४. कडक व चिवट ५७. दरवाजा ५८. नरमच्या विरुद्ध ६०. एक गळीत धान्य ६१. पवित्र ६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव ६५. तात्पर्य ६६. दु:ख, हळहळ

शब्दकोडे-३५५चे उत्तर

आडवे उत्तर
१.दाब ३.गगनभेदी ८.वास १०.भास १२.हिमालय १४.गरजवंत १६.रानवट १८.पारंगत २०.नाग २१.रासभ २२.हयात २४.वडीलधारी २६.ताई २७.टरफल २९.पाचर ३०.पर ३२.वारस ३३.जननमरण ३५.लस ३७.माई ३८.नीरस ४०.सट ४१.महाल ४२.पडसाद ४३.ऊस ४४.वीर ४५.कप्पा ४६.नरवर ४९.महामाता ५१.होन ५३.कर ५५.चकणा ५६अ.कस ५७.पराक्रम ५९.कलेवर ६१.कलाकार ६३.जाजम ६४.तरु ६५.तापट ६७.काळवीट ६९.दादर ७२.कारभार ७३.समता ७४.कलमदान ७७.हालहवाल ७८.साल ७९.कट ८०.पाटीलकी

उभे उत्तर
२.बहिरभट ३.गलत ४.गय ५.भेग ६.दीर ७.सवंगडी ९.सरासरी १०.भाव ११.सटवाई १३.माग १५.जनावर १७.नभ १९.पाया २१.राधा २२.हलवाई २३.तपासनीस २५.लहानसहान २६.तारणहार २८.रजा ३०.परमवीरचक्र ३१.कलप ३४.नट ३६.सड ३७.मादकता ३९.सहायक ४७.रजपज ४८.वीणा ४९.मधुकर ५०.मानवता ५२.नकलाकार ५४.रट्टा ५६.कमतरता ५६ब.सकाळ ५८.रामदास ६०.रपका ६२.रवी ६६.टरफल ६८.टकमक ७०.दमदाटी ७१.मंगल ७४.कल ७५.दाट ७६.बाकी

'होळी' सणाचे पावित्र्य राखूया !

दुष्प्रवृत्ती आणि अयोग्य विचार यांची होळी करून सत्प्रवृत्ती जोपासण्याचा संकल्प करण्याचा सण म्हणजे होळी. भारतात स्थानपरत्वे हा सण साजरा करण्याच्या पद्धतीही भिन्न भिन्न असल्याच्या पाहायला मिळतात. होळी साजरी करण्यामागील कथाही राज्यानुसार आणि चालीरीतीनुसार वेगवेगळ्या सांगितल्या जातात. काही प्रदेशात होळीला अधिक महत्व दिले जाते, तर काही ठिकाणी होळीनंतर येणाऱ्या रंगपंचमीला. गेल्या काही वर्षांत शहरासारख्या ठिकाणी होळी सणामध्ये गैरप्रकारांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला पाहायला मिळतो ज्यामुळे या सणाचे पावित्र्य कुठेतरी कमी होऊ लागले आहे. होळीचे निमित्त करून आठवडाभर आधीपासूनच इमारतींच्या गच्चीवरुन, रेल्वे गाड्या, बसेसवर पाण्याने भरलेले फुगे, प्लास्टिक पिशव्या फेकून मारल्या जातात. यांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन मुलींसह नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या तरुणींना खासकरून लक्ष्य केले जाते. दरवर्षी केवळ पाण्याने भरलेले फुगे मारण्यामुळे कितीतरी अपघात घडतात, कितीतरी जणांना डोळे गमवावे लागतात, तर कित्येकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. मागील ५-६ वर्षांपासून होळीच्या निमित्ताने फुग्यांना पर्याय म्हणून पातळ प्लास्टिक पिशव्या विक्रीसाठी बाजारात येऊ लागल्या आहेत. धूलिवंदनाच्या दिवशी दुपारीच या प्लास्टिक पिशव्यांचा खच रस्त्यावर साचलेला पाहायला मिळतो. हवेसोबत उडत जाऊन या पिशव्या नाल्यांत आणि गटारांत साचतात. २६ जुलै २००५ या दिवशी मुंबईत महाप्रलय आला होता ज्याला मुख्यत्वे कारणीभूत प्लास्टिक पिशव्याच होत्या. वर्षभर प्लास्टिक निर्मूलनासाठी प्रयत्न करणारे पालिका प्रशासन होळीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर कायदेशीर कारवाई करताना कुठे दिसत नाही. काही ठिकाणी परस्परांतील वैमनस्य काढण्यासाठी इतरांच्या वस्तू चोरून त्या होळीत जाळल्या जातात. होळीच्या ठिकाणी बोंब मारण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे; मात्र हल्ली या प्रथेच्या आड कुणाचे तरी नाव घेऊन घाणेरड्या शिव्या घातल्या जातात. धुलीवंदनाच्या दिवशी एकमेकांना रासायनिक रंग फासले जातात ज्यामुळे बऱ्याचदा गंभीर स्वरूपाचे त्वचाविकार होतात. नासकी अंडी फेकून मारली जातात, मद्यपान करून रस्त्यांवर धिंगाणा घातला जातो, महिलांना पाहून अश्लील शेरेबाजी केली जाती. लोकांना आणि गाड्या अडवून जबरदस्तीने पैसे उकळले जातात. या अपप्रकारांना रोखण्यासाठी दरवर्षी पोलिसांना शासनाकडून आदेश द्यावे लागतात, याची खरे तर आपल्याला लाज वाटायला हवी. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव यामागे लोककल्याणाचा आणि सामाजिक एकोप्याचा उदात्त हेतू दडलेला आहे. होळीसारख्या पवित्र सणामध्ये शिरलेल्या गैरप्रकारामुळे या दिवसांत अनेक जण घराबाहेर पडणे टाळू लागले आहेत. सणांमागील शास्त्र लक्षात घेऊन ते साजरे केल्यास मनुष्याला त्यातून आनंद मिळतो: मात्र होळीसारख्या पवित्र सणाला आलेले ओंगळवाणे स्वरूप पाहता आपणच आपल्या धर्माची अवहेलना करत आहोत हे हिंदू केव्हा जाणणार आहेत ?

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

'नेट झिरो'मध्ये भारत जगात पहिला

मराठमोळे ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे यांच्या पुढाकारामुळे देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा

पुणे । प्रतिनिधी

हवामान बदलाचे संकट थोपविण्यासाठी आणि पर्यावरण संरक्षणासाठीची 'नेट झिरो' ही मोहिम उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये राबविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. मराठमोळे ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे यांच्या पुढाकारामुळे भारताच्या शिरपेचात हा मानाचा तुरा खोवला गेला आहे. या मोहिमेमुळे भारताने एक पाऊल पुढे टाकत जगातील अनेक देशांपुढे आदर्श निर्माण केला आहे. तसेच नजिकच्या काळात अन्य देशांच्या उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये ही मोहिम राबविली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शांतता नोबेल विजेत्या आयपीसीसी अहवाल २००७चे समन्वयक प्रमुख सहलेखक, युनेपचे माजी संचालक आणि वैश्विक ओझोन कृती समितीचे माजी प्रमुख असलेल्या डॉ. राजेंद्र शेंडे यांनी ग्रीन तेर फाऊंडेशनच्या माध्यमातून जगभरात नेट झिरो ही चळवळ उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये उभारली आहे. या मोहिमेअंतर्गत देशातील ५०० हून अधिक विद्यापीठे, शेकडो महाविद्यालये, आयआयटीसारख्या नामांकीत संस्था सहभागी झाल्या आहेत. याद्वारे देशातील जवळपास १ लाख विद्यार्थी पर्यावरण संरक्षणासाठी सज्ज होत आहेत.

अशी आहे नेट झिरो मोहिम

हवामान बदल, जागतिक तापमान वाढीचे संकट रोखायचे असेल तर हरित गृह वायूंचे उत्सर्जन थांबवावे लागेल. त्यासाठी आपापला परिसर नेट झिरो म्हणजेच कार्बन डाय ऑक्साईडसह हरित गृह वायूंचे शून्य

उत्सर्जन करणारा ठरायला हवा. जागतिक पातळीवरच ही संकल्पना राबविली जात आहे.

यांच्या सहभागाने बळ

ग्रीन तेर फाऊंडेशनच्या या चळवळीत केंद्रीय पर्यावरण मंत्रालय, केंद्रीय शिक्षण मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), एनर्जी इफिशिअन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (ईईएसएल), भारतीय तंत्रशिक्षण संचालनालय (एआयसीटीई), द एनर्जी रिसोर्ट इन्स्टिट्यूट (टेरी), युनेस्को, एनबीए, एनआयआरएफ, असोचॅम, निती आयोग आदींनी सक्रीय सहभाग घेतला आहे.

असा होणार फायदा

विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरण साक्षर बनविले जात आहे. सौर, पवन, जलविद्युत यासह अपारंपरिक स्त्रोतांद्वारे ऊर्जा निर्मिती, ऊर्जा कार्यक्षमता, वीजेची बचत यावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले जात आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांचा कॅम्पस प्रदूषणमुक्त केला जाईल. त्यासाठी कचऱ्याचे व्यवस्थापन, पेपरलेस कामकाज, पर्यावरणस्नेही पर्यायांचा अवलंब करण्यात येत आहे.

कार्यशाळांमधून चालना

पश्चिम भारतासाठी पुणे विद्यापीठ, ईशान्य भारतासाठी गुवाहाटीतील आयआयटी, दक्षिण भारतातील चेन्नईच्या एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि उत्तर भारतासाठी दिल्ली विद्यापीठ येथे कार्यशाळा झाली. त्यात विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच, आगामी काळात करावयाच्या कृतीसंदर्भातील रोडमॅपही निश्चित करण्यात आला आहे.

तज्ज्ञ मान्यवर म्हणतात

तरुणांचा देश अशी भारताची ओळख आहे. हेच तरुण आपल्या कृतीतून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी सज्ज झाले आहेत. नेट झिरो मोहिमेतून यापुढील काळात अतिशय महत्त्वपूर्ण कार्य घडणार आहे. जागतिक इतिहासात त्याची नोंद झाल्याशिवाय राहणार नाही.

- डॉ. राजेंद्र शेंडे, संस्थापक संचालक, ग्रीन तेर फाऊंडेशन

भारत देशाला नेट झिरो करण्याचे उद्दीष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये नेट झिरो ही मोहिम राबवून तरुणांमध्ये जनजागृती केली जात आहे. तसेच, ते प्रत्यक्ष कृतीसाठी तयार होत आहेत. ही अतिशय आनंद आणि अभिमानाची बाब आहे.

- प्रकाश जावडेकर, माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री.

नेट झिरो ही मोहिम जगभरात राबविली जात आहे. मात्र, उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये ती राबविणारा भारत हा एकमेव आणि मोठा देश आहे. भारताचा आदर्श इतरांनीही घ्यावा. भारतीय तरुण नक्कीच मैलाचा दगड तयार करतील, अशी आशा आहे.

- इरिक सोल्हेम, पर्यावरण तज्ज्ञ

भाजप सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संवेदनशील- बापुराव पिंगळे

नाशिक । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संवेदनशील आहे. कृषी प्रधान भारत देश म्हणुन अनेक योजना, मदत, मार्गदर्शन व सहकार्य केंद्र सरकारच्या माध्यमांमधून राबविल्या जातात. आगामी काळ हा कृषी व कृषी प्रक्रिया उद्योगांना पुरक असून यामुळे आगामी काळात देशातला बळीराजा सुखी संपन्न होईल, असे उदगार भाजप नाशिक महानगर किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष बापुराव पिंगळे यांनी काढले.

भाजप किसान मोर्चाची कार्यकारीणी बैठक व पद नियुक्ती पत्र वाटप भाजप, वसंत स्मृती कार्यालय, नाशिक येथे संपन्न झाले. याप्रसंगी उपस्थित प्रशांत जाधव, सुनिल केदार, नाना शिलेदार आदींनी

मनोगत व्यक्त केले. केंद्र सरकार शेतकऱ्यांना दरवर्षी ६,००० रुपये व राज्य सरकार ६,००० रुपये असे १२,००० रुपये शेतकऱ्यांच्या बँक खाते दरवर्षी जमा होतात. ३ लाखापर्यंत पिक कर्जास व्याज माफी, फुड प्रोसेसिंग उद्योगांना चालना, मिलेट्स म्हणजे कडधान्य पिकापासून तयार होणाऱ्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ, कृषी कर्ज वितरण सुलभता व किसान क्रेडिट कार्ड, देशातील सर्व साखर कारखान्यांचे ३० वर्षांपासून व्यवसाय कराचे देय असलेले १० हजार कोटी रुपये माफ केले, इथेनॉल व सीएनजी प्रकल्पांना सबसिडी व उभारणीस चालना, देशातील सर्व वि. का.सोसायट्याना १५३ व्यवसाय सुरू करण्यासाठी परवानगी तसेच सर्व सोसायट्या ऑनलाईन जोडणे, विज प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सबसिडीत सोलर पंप योजना, जलयुक्त शिवार योजना, आगामी नदी जोड प्रकल्प, कृषी पिकांना हमीभाव, खाजगी कृषी उत्पन्न बाजार समित्या उभारण्यास परवानगी व चालना अशा एक ना अनेक योजनांद्वारे केंद्र सरकार शेतकऱ्यांना मदत करत असल्याचे बापुराव पिंगळे यांनी सांगितले.

याप्रसंगी भाजप नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस सुनील केदार व नाना शिलेदार, ज्येष्ठ नेते विजय साने, किसान मोर्चा अध्यक्ष बापुराव पिंगळे, सरचिटणीस आनंदराव चौधरी, संजय गामने, एकनाथ तपकिरे, मोहन गवारे, सुभाष शिंदे, भिमराव पाटील - कडलग, सुरेश देशमुख, रघुनाथ माळोदे, हेमंत आगळे, जाफर सय्यद, सतबिर सिंग दहिया, संजय शिंदे, राजु माळोदे, आदिनाथ दिवटे, रतन घाटोळ, प्रगतशील शेतकरी विठ्ठलराव माळोदे आदीसह शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

क्रोमाच्या समर कॅम्पेन २०२४ सह अनलॉक करा जादू

नाशिक । क्रोमाने त्यांची समर कॅम्पेन जाहीर केले असून, हे कॅम्पेन मे २०२४ पर्यंत चालणार आहे. उन्हाळ्याच्या प्रारंभासह, सर्वाधिक प्रतीक्षेत असलेला समर सेल आला आहे. ग्राहकांना वाढत्या तापमानाचा सामना करण्यासाठी अत्याधुनिक डील आणि पेमेंट सुलभतेसह नवीनतम गॅझेट्ससह त्यांची घरे तयार करण्याची यातून उत्तम संधी मिळते.ग्राहकांना स्टोअर्स आणि क्रोमा डॉट कॉम वर फक्त १,५०० रुपयांपासून सुरू होणारे १.५ टन स्प्लिट एसी मिळतील. ग्राहक कोणतेही इलेक्ट्रॉनिक्स आणू शकतात आणि नवीन एसी घरी घेऊन जाऊ शकतात.४५००० रुपये पर्यंतचे फायदे आणि २५० प्लस एअर कंडिशनर्स, ३००+ रेफ्रिजरेटर्स, रूम कूलर आणि फॅन्सच्या विस्तृत श्रेणीवर आकर्षक एक्सचेंज आणि अपग्रेड पर्याय, कॅशबॅक ऑफर आणि २४ महिन्यांपर्यंतच्या ईएमआय योजनांचा आनंद घ्या. रु.४,५०० पासून रुम कूलर उपलब्ध आहेत ज्यांना किफायतशीर कूलिंग सोल्यूशन्स आहेत त्यांच्यासाठी आदर्श आहे.

टाटा एआयए लाईफचा नवा टाटा एआयए रायजिंग इंडिया फंड

नाशिक ।

भारतातील आघाडीच्या जीवन विमा कंपन्यांपैकी एक, टाटा एआयए लाईफ इन्शयुरन्सने (टाटा एआयए) टाटा एआयए रायजिंग इंडिया फंड लॉन्च केला आहे. हा फंड भारताच्या विकास यात्रेत सहभागी होण्यासाठीच्या संधींचे द्वार ग्राहकांसाठी खुले करत आहे. एनएफओ ३१ मार्च २०२४ पर्यंत खुली राहील. एनएफओ कालावधीत युनिट्स १० रुपये प्रति युनिट एनएव्हीवर प्रस्तुत केले जातील. रायजिंग इंडिया फंड अशा प्रमुख क्षेत्रांमध्ये आणि कंपन्यांमध्ये गुंतवणूक करेल, ज्या आत्मनिर्भर भारताच्या घोडदौडीला वेग मिळवून देत आहेत. यामध्ये पायाभूत सोयीसुविधा, उत्पादन, बँकिंग, डिजिटल, संरक्षण इत्यादींचा समावेश आहे. हा फंड विविध मार्केट कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करेल आणि सेक्टर एग्नोस्टिक असेल, ज्यामुळे फंड मॅनेजर भारताच्या विकास इंजिनाला चालना देणाऱ्या विविध संधींचा लाभ घेण्यात सक्षम बनतील.

एनएफओ लॉन्चबद्दल, टाटा एआयएचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि मुख्य गुंतवणूक अधिकारी (सीआयओ) श्री हर्षद पाटील यांनी सांगितले, गेल्या काही वर्षात भारताने सर्वाधिक वेगाने विकसित होत असलेली प्रमुख अर्थव्यवस्था बनून जगभरात आपला प्रभाव दर्शवला आहे. आम्ही आमच्या फंड कामगिरीतून अल्फा जनरेट करण्याच्या दिशेने नेहमीच प्रयत्नशील राहू. प्रभावीपणे चालवली जात असलेली संशोधन प्रक्रिया आणि बॉटम-अप स्टॉक निवडण्याच्या दृष्टिकोनासह आम्ही आमच्या पॉलिसीधारकांना शाश्वत मूल्य आणि परतावा मिळवून देण्यासाठी बांधील आहोत. भांडवलामध्ये मूल्य वृद्धी करण्यासाठी या फंडमध्ये ७०% ते १००% गुंतवणूक इक्विटी व इक्विटीशी संबंधित साधनांमध्ये आणि ०% ते ३०% गुंतवणूक कर्ज व मनी मार्केट साधनांमध्ये केली जाईल. टाटा एआयए रायजिंग इंडिया फंडमध्ये गुंतवणूकदारांना एकाच फंडमध्ये उच्च गुणवत्तापूर्ण, वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ आणि उत्तम कामगिरी बजावण्याची क्षमता असलेल्या विविध मार्केट कॅप्समध्ये गुंतवणूक करण्याची संधी मिळेल.

चित्रकर्ती ज्योत्स्ना कदम यांच्या चित्र : चिंतन प्रदर्शनाला प्रारंभ

नाशिक । प्रतिनिधी

मुंबईतील ख्यातनाम चित्रकर्ती ज्योत्स्ना संभाजी कदम यांच्या अमूर्त शैलीतील चित्र - चिंतन प्रदर्शन नाशिकमध्ये आयोजित करण्यात आले आहे. तिडके कॉलनीतील इंडक्सआर्ट कलादालनात काल शुक्रवारी (दि.२२) या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन चित्रकार डॉ. विजय सकपाळ यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

आरती पंचाक्षरी यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. या प्रदर्शनात कागदावर क्रलिक रंगात रंगवलेली सुमारे ३५ चित्रे मांडण्यात आली आहेत. सर्जनशील आणि चिंतनशील चित्रकर्ती ही ज्योत्स्ना कदम यांची ओळख आहे. त्यांचा कलाप्रवास निर्माण झालेली निसर्गाची

निसर्ग व व्यक्तीचित्रणापासून सुरु झाला. नंतर त्या अमूर्त संकल्पना चित्रातून व्यक्त करायला लागल्या. चित्र - चिंतन या प्रदर्शनात त्यांनी रंगरेषेद्वारे विचार मांडले असून त्या कवी मनाच्या लेखिकाही आहेत. तीन दशकांहून अधिक त्यांची कलाकारकीर्द आहे. अनभिज्ञ नजरांनाही सहज कळेल असा आशय रंगांच्या फटकाऱ्यांमधून त्यांनी साधला आहे. छायाप्रकाशाच्या खेळातून किमया बघणाऱ्याला मोहून टाकते. हे चित्र -चिंतन म्हणजे प्रत्यक्षातल्या पल्याड असणारी सृष्टी. हा अलौकिकतेकडे नेणारा प्रवास प्रत्येक कलारसिकाने करायला हवा. हे चित्रप्रदर्शन दि.३१ पर्यंत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत कला रसिकांसाठी विनामूल्य खुले राहील. उद्घाटन समारंभाला चित्रकार अशोक ढीवरे, बाळ नगरकर, अतुल भालेराव, संजय देवधर, सुहास जोशी यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

ग्राहकांच्या सुविधेसाठी आज- उद्या वीजबिल भरणा केंद्र सुरु

नाशिक । प्रतिनिधी

ग्राहकांना वीजबिलाचा भरणा करणे अधिक सुलभ व्हावे, यासाठी शनिवार व रविवारी २३ व २४ मार्च २०२४ या साप्ताहिक सुटीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्याचे निर्देश नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता दिपक कुमठेकर यांनी दिले आहेत. त्यानुसार नाशिक जिल्ह्यातील महावितरणचे सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र सुरू राहणार असून या सुविधेसह डिजिटल माध्यमातून ग्राहकांनी आपल्या चालू व थकीत वीजबिलाचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्यासोबतच थकीत वीजबिल वसुलीसाठीची कारवाई सुट्टीच्या दिवशी सुरु राहणार आहे. थकबाकीदार ग्राहकांनी वीज पुरवठा खंडित होण्याची कटू कारवाई टाळण्यासाठी आपल्या विद्युत बिलाचा भरणा वेळेत करावा. अधिकृत वीजबिल भरणा केंद्राशिवाय महावितरणच्या मोबाईल अँप (-ी) वर वीजबिल भरणा तसेच इतर सर्व सुविधा उपलब्ध आहेत. ु.ारहरवळीलेा. ळप या संकेतस्थळावर केवळ बारा अंकी ग्राहक क्रमांक नमूद करून नेट बँकिंग, डेबिट किंवा क्रेडिट कार्ड आदींच्या माध्यमातून वीजबिल भरता येते. तसेच वीजबिलावर दिलेला क्यूआर कोड स्कॅन करूनही थेट पेमेंट गेटवेवर जाऊन वीजबिल भरणे सुलभ होते, या डिजिटल माध्यमांचा वापर करून घरबसल्या वीजबिल भरता येईल. अखंडित वीज सेवेसाठी उपलब्ध सुविधांचा उपयोग करून चालू व थकीत वीजबिलाचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात येत आहे.

'आप' राज्य मिडिया प्रमुख चंदन पवार यांचा भाजपात प्रवेश

नाशिक । प्रतिनिधी

आम आदमी पार्टीचे माजी राज्य मिडिया प्रमुख चंदन पवार यांनी भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते भाजपात प्रवेश केला आहे. आपच्या सर्व पदांचा त्यांनी यापूर्वीच राजीनामा दिला. पवार यांनी २०१३ मध्ये आप मध्ये प्रवेश केला होता, त्यानंतर त्यांना विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली होती. आम आदमी पार्टीची सत्ता नसल्यामुळे ज्या वेगाने जनतेची कामे व्हायला हवी होती ती होत नव्हती.

यावेळी पवार यांच्यासोबत महाराष्ट्रचे आप हेल्थ विंगचे डॉ. शरद बोडके, राज्य समन्वयक बाळासाहेब बोडके, मालेगावचे माजी उपाध्यक्ष रवींद्र पवार, माजी पदाधिकारी महेंद्र अहिरे यांनी प्रवेश केला आहे. प्रवेशानिमित्त पवार यांनी मिडियाशी बोलतांना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी आपल्या कार्यकाळात ३७० कलम हटविले, सीएए सारखा कायदा आणला, तीन तलाक आणि राम मंदिर यासारख्या प्रश्नांवर क्रांतिकारक निर्णय घेतले आहेत, अनेक जनहिताच्या योजना त्यांनी लॉन्च केल्या, भारत देशाचे नाव त्यांनी जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविले, यापुढेही देशाच्या भल्यासाठी महत्वाचे

निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात असल्यामुळे त्यांच्या कार्यशैलीवर मोहित झालो आहे.

सत्तेवर असलेला पक्षात जनतेची कामे करता येतात हा अनुभव असल्यामुळे मी भाजपामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. यापुढें भाजपात जनतेचे काम करण्याची संधी मिळेल, जे व्यवस्था परिवर्तन करण्यासाठी मी आम आदमी पार्टीत प्रयत्न केलेत त्यांची संधी मला भाजपाचे वरिष्ठ नेते देतील याची मला खात्री आहे, मी १० टक्के राजकारण आणि ९० टक्के समाजकारण करण्याचा प्रयत्न करेन, पक्ष प्रवेश भाजपाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात झाला, प्रवेशाप्रसंगी भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार श्रीकांत भारतीय, अजित चव्हाण उपस्थित होते.

हभप पुंजाराम थेटे यांची नर्मदा परिक्रमा निर्विघ्न पूर्ण

नाशिक । प्रतिनिधी

हभप पुंजाराम दगु थेटे दुगांवकर यांनी नर्मदा परीक्रमा निर्विघ्न पुर्ण केल्याबद्दल अ. भा. वारकरी मंडळाचे नाशिक जिल्हाध्यक्ष हभप आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर, तालुकाध्यक्ष हभप दिनकर महाराज खांडबहाले, उपाध्यक्ष हभप बाळासाहेब महाराज गायकर यांनी निवासस्थानी त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. त्यांना भाऊसाहेब थेटे, राजाभाऊ तांबेआडगांव, शिवाजी गायके पैसे, संपत टिळे बाभळेश्वर, गंगाराम महाराज शेलार विंचुरी गवळी, हेमंत शिंदे दुगांव यांचे समवेत नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्यासाठी सहवास लाभला असे हभप पुंजाराम पाटील थेटे यांनी सांगितले.

नि. नं. ६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो (क.स्तर) यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं. ४४२/२०२४

१) श्रीमती. रंजना आबा पाटील
२) सौ. मनिषा मधुकर पाटील
३) सौ. ममता संदीप पाटील
४) श्री. वैभव आबासाहेब पाटील ....अर्जदार

वि.

कोणीही नाही...

(कै. आबा बाबुराव पाटील) मयत
निधनाच्या वेळी मयताचा पत्ता पुणे ...सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी त्यांचे मयत सासरे/पती/आजोबा/वडील कै. आबा बाबुराव पाटील यांचे वारस दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज या मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणास काहीएक हरकत असल्यास त्यांनी धुळे येथील मे. ७ वे सह दिवाणी न्यायाधीश सो क.स्तर यांचे न्यायालयात दि.०८/०५/ २४ रोजी स्वतः अगर वकिलामार्फत हजर रहावे. वरीलप्रमाणे कोणाचीही हरकत न असल्यास या अर्जाच्या कामी कोणाचीही, कोणत्याही प्रकारची काही एक हरकत नाही असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस या मे. न्यायालयाच्या सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि.२२/०३/२०२४ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

अॅड.उज्वला पितांबर पाटील/अँड. संदीप अर्जुन गर्दे
नि. नं. ६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालय

दि.कि. अर्ज क्र.४२४/२०२४

१. दिलीप सिताराम पाटील वगैरे ....अर्जदार

वि.

निरंक ... जाबदेणार

कै. मालुबाई दिलीप पाटील रा.बोदगाव, ता.जि.धुळे ...मयत

ज्या अर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ८ सो.धुळे यांचेकडे दि.६/५/२०२४ रोजी अर्जदार यांनी कि.दि. अर्ज क्र.४२४/२०२४ चा अर्ज कै. मालुबाई दिलीप पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.०६/०५/२०२४ हि निश्चित केली आहे. त्या अर्थी तमामजनतेस, हितचिंतक,वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कोर्ट नं. ८ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. १९/०३/२०२४ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**

अॅड.संदीप अर्जुन गर्दे
नि. नं. ६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.कि. अर्ज क्र.४४१/२०२४

१. रमाबाई भिवसन चव्हाण वगैरे ....अर्जदार

वि.

निरंक ... जाबदेणार

कै. भिवसन मोतीराम चव्हाण (पाटील) अनकवाडी ता.जि.धुळे ...मयत

ज्या अर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. सो.धुळे यांचेकडे दि १९/०३/२०२४ रोजी अर्जदार यांनी कि. दि. अर्ज क्र. ४४१/२०२४ चा अर्ज कै. भिवसन मोतीराम चव्हाण (पाटील) यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. ०२/०५/२०२४ हि निश्चित केली आहे. त्या अर्थी तमामजनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कोर्ट नं. ६ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि.२१/०३/२०२४ आदेशावरुन

कामगिरी कारकुन **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**

संमिश्र

लक्ष महाराष्ट्र

शनिवार दि. २३ मार्च २०२४

४

न्यूज कॉलम

शेतकऱ्यावर तीक्ष्ण हत्याराने वार

धुळे । तालुक्यातील मुकटी येथे गुरे बांधण्याच्या जागेवरून हाणामारी झाली. बंडू पाटील यांनी फिर्याद दिली आहे. मंगळवारी रात्री त्यांच्याशी रोशन राजेंद्र पाटील वय ३८, भूषण राजेंद्र पाटील वय ३५, राजेंद्र पंडित पाटील वय ५५ यांनी भांडण करत शिवीगाळ व मारहाण केली. रोशनने फिर्यादीच्या डोक्यात फायटरने वार केला. भूषणने तीक्ष्ण हत्याराने भोकसत जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

सकल जैन समाजातर्फे भजन संध्या

दोंडाईचा । सकल जैन समाज आणि जैन ड्युड्स फ्रेंड्स सर्कलतर्फे दादावाडी जैन मंदिराजवळ हस्ती नगरात नुकताच गुरुभक्ती संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी बिकानेर राजस्थान येथील भजन गायक पिंटु स्वामी, रायपुर छत्तीसगढचे रतन कोटडिया आणि त्यांच्या चमूने आरती, गुरू एकतीसा, गुरू चालिसा, भजन आणि इतर धार्मिक गीते प्रस्तुत केली.

'दयन' कादंबरीला चंद्रांजन पुरस्कार जाहीर

धुळे । येथील एच.आर. पटेल महिला महाविद्यालयाचे प्रा.डॉ. युवराज पवार यांच्या दयन कादंबरीला यवतमाळ जिल्ह्यातील 'चंद्रांजन पुरस्कार' नुकताच जाहीर झाला आहे. ह्या कादंबरीची महाराष्ट्रातील २३ कादंबऱ्या प्रवेशिकांमधून निवड झाली आहे. तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या अभावग्रस्त, आशा आकांक्षाची व्यवस्थेच्या चक्कीने केलेल्या 'दयन'ची वास्तववादी समीक्षा करणारी, कथानायकाच्या बंजारा व लेवा गणबोलीचा सहज सौंदर्यपूर्ण वापर करणारी, नव्या पिढीच्या लेखकाची दमदार व वाचनीय कादंबरी असे मत परिक्षक डॉ. गजानन मालोकार यांनी कादंबरी प्रति मांडताना हा निकाल जाहीर केला आहे.

दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना आरोग्य कीट देण्याचे काम कौतुकास्पद : पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

सर्व समाजहिताची, सार्वजनिक कामे सरकारनेच करावी, असा एक दृढ समज आहे. मात्र, अलीकडच्या काळात खाजगी क्षेत्राने व्यापक रुप धारण केले आहे. अशा परिस्थितीत समाजासाठी, दुर्गम भागातील वंचितांसाठी आपण त्यांचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून काम करणारी मंडळी कमी आहेत. त्यामुळेच 'देणार्याने देत जावे...' या उक्तीला जागत डीपीटीएल कंपनी धुळे-पळासनेरचे प्रकल्प अधिकारी कृष्णा राव यांचे कार्य प्रशंसनीय ठरते. दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना आरोग्य कीट देण्याचे काम कौतुकास्पद आहे. यामुळे आरोग्य सुविधा सुदृढ करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी व्यक्त केली.

डीपीटीएल कंपनी धुळे-पळासनेर यांच्या माध्यमातून आणि प्रकल्प अधिकारी कृष्णा राव यांच्या संकल्पनेतून सीएसआर फंडातून प्राथमिक आरोग्य केंद्रांना आरोग्य कीट देण्याचा कार्यक्रम २० मार्चला शिरपूर टोल प्लाझा येथे घेण्यात आला. त्यावेळी पोलिस अधीक्षक धिवरे बोलत होते. शिरपूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक के. के. पाटील, शिरपूर तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे, कोशाध्यक्ष तुषार बाफना कुणाल अग्रवाल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न कुलकर्णी, शिरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. अमोल जैन आदी प्रमुख अतिथी होते.

पोलिस अधीक्षक धिवरे म्हणाले, की कृष्णा राव यांनी सकारात्मक उपक्रम हाती घेतला आहे. खाजगीकरणातील घटक आता समाजपयोगी कामांमध्ये सहभागी होत आहे. त्याची सुरुवात श्री. राव यांनी केली आहे. त्यांनी एक चांगला कार्यक्रम हाती घेतला आहे. योग्य वस्तू योग्य ठिकाणी दिल्या आहेत. चांगल्या एनजीओंना त्यांनी पाठबळ दिले आहे. सीएसआर फंडाचा चांगल्या प्रकारे वापर करण्याचे व्हिजन त्यांच्याकडे आहे. आजही आपल्याकडे ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या चांगल्या सुविधा नाही. कृष्णा राव यांच्या संकल्पनेतून आरोग्य कीट दिली गेले आहेत. या कीटचा समाजातील उपेक्षित रुग्ण घटकांसाठी उपयोग कराल, अशी अपेक्षा उपस्थित डॉक्टरांकडून श्री. धिवरे यांनी व्यक्त केली. श्री. गर्दे यांनी मनोगत व्यक्त करताना कृष्णा राव यांनी एक चांगला, समाजपयोगी उपक्रम राबविला आहे. त्यामुळे त्यांचे कौतुक करतो, त्यांच्या कार्याला शुभेच्छा देतो, असे सांगितले.

पोलिस अधीक्षकांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. बन्सीलाल पावरा, डॉ. निखिल दवे, डॉ.चंदन पवार, डॉ. दीपक पावरा यांना आरोग्यकीटचे वाटप करण्यात आले.पोलिस अधीक्षक धिवरे, पोलिस निरीक्षक पाटील, श्रीराम पवार, श्री. गर्दे यांचा वंदन संस्थेकडून स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. डीपीटीएलचे ऑपरेशन मॅनेजर श्रीनिवास, अकाउंट हेड सनी प्रसाद, शिरपूर टोलचे मॅनेजर बाला कृष्णा, रूट मॅनेजर पवनकुमार सिंग, मेंटनस मॅनेजर हरी सिंग, आयटी मॅनेजर संजय चव्हाण, इलेक्ट्रीक मॅनेजर कमलेश साहू, मेंटेनस इंजिनियर्स शुभम तिवारी, सहाय्यक हिशेब तपासणीस धनेश कुमार, आयटी मॅनेजर अजय शुक्ला, रेसी प्रोजेक्ट हेड शिवा, रूट्स सुपरवायझर अजय पाटील, लाला पुरोहित, शिवाजी पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. यशवंत निकवाडे यांनी केले.

केजरीवालांना अटक प्रकरणाचा आम आदमी पार्टीकडून निषेध

सरकारने ईडीचा गैरवापर थांबविण्याची मागणी

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

गेल्या अनेक दिवसांपासून नरेंद्र मोदी सरकार विरोधी पक्षातल्या नेत्यांवर ईडीचा गैरवापर करून कारवाई करत आहे. ईडी देखील मोदी सरकारच्या आदेशावरून काम करत असून ईडी केंद्र सरकारच्या आदेशानुसार विरोधी पक्षातील नेत्यांना नोटीस पाठवते, नंतर ईडीने नोटीस पाठवलेले इतर पक्षातील नेते बीजेपीमध्ये गेल्यानंतर त्यांच्यावरील कारवाई थांबवते. असा आरोप करत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची अटक केल्याच्या निषेधार्थ आम आदमी पार्टीतर्फे काल जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात येऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर देखील ईडीने मोदी सरकारच्या आदेशानुसार कारवाई सुरू करून अरविंद केजरीवाल यांना दि. २१ मार्च रोजी अटक केली आहे. लोकसभा निवडणूकीमध्ये मोदी सरकारच्या विरोधात अरविंद केजरीवाल यांनी प्रचार करू नये या भीतीने मोदी सरकारने अरविंद केजरीवाल यांना ईडीचा गैरवापर करून अटक केलेली आहे असा आरोप करण्यात आला आहे.

आम आदमी पार्टीच्या दिल्ली आणि पंजाब सरकारने शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी, महिला सुरक्षा या क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्याने अरविंद केजरीवाल याची लोकप्रियता वाढत असल्याने त्यांना बदनाम करण्याचा मोदी सरकार जो प्रयत्न करत आहेत त्याचा आम आदमी पार्टी निषेध करत आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केल्याच्या निषेधार्थ आम आदमी पार्टी नाशिक टीमने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करत जोरदार निदर्शन केली.

आंदोलनात आम आदमी पार्टीचे राज्य संघटनमंत्री नविंदर सिंग आहलुवालिया, नाशिक शहराध्यक्ष अमोल लांडगे, प्रदेश युवा सह-संघटक प्रदीप लोखंडे, अमर गांगुर्डे, ऍड.प्रभाकर वायचळे, अभिजीत गोसावी, निर्मला दानी, गिरीश उगले पाटील, योगेश कापसे, अभिजीत गोसावी, नुतन कोरडे, विकास पाटील, कलविंदर ग्रेवाल, संजय कातकडे, विनायक येवले, पद्माकर आहिरे, एकनाथ साळवे, सुमित शर्मा, शांताबाई बनकर, प्रमोदिनी चव्हाण, अल्ताफ शेख, अनिल कौशिक, बंडू नाना डांगे, मेघराज भोसले, दिलीप कोल्हे, नितीन भागवत, मंजुषा जगताप आदी सहभागी झाले होते.

कोचरगावच्या आसपासच्या गावांतील १५०० विद्यार्थ्यांसाठी शिक्षण केंद्र स्थापित

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

नाशिक राउंड टेबल १०७, नाशिक लेडीज सर्कल ११९ संयुक्त विद्यमाने उपक्रम

नाशिक राउंड टेबल १०७ आणि नाशिक लेडीज सर्कल ११९ यांनी कोचरगावाच्या आसपासच्या गावांतील १५०० विद्यार्थ्यांसाठी शिक्षण आणि सशक्तीकरण प्रदान करण्याच्या एक परिवर्तनात्मक प्रकल्पाचे उद्घाटन केले. आलेल्या विविध आव्हानांना समर्थपणे पेलत संस्थांनी आपल्या दृष्टिकोनाचे प्रत्यक्षीकरण करण्यासाठी अटल राहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

उद्घाटन समारंभातील महत्त्वाच्या व्यक्तिंच्या उपस्थितीच्या माध्यमातून, एनपी एलएमएफ क्र. चेरिल संतोष, क्षेत्र ३ एसीपी क्र. नेहा धारिवाल, राष्ट्रीय प्रकल्प संवादीकरण क्र. अंकिता अग्रवाल, आणि आईपीसी क्षेत्र ३ टीआर कुणाल अग्रवाल यांनी महत्त्वाचे योगदान दिले. नाशिक राउंड टेबल १०७ चेयरमन मानव अग्रवाल आणि नाशिक लेडीज सर्कल ११९ चेयरपर्सन चारु लाठी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम सुरू आहेत. या प्रयत्नातून दुर्गम आदिवासी भागाच्या म्हणजेच कोचरगावच्या आजूबाजूच्या खेड्यापाड्यांचा विकास करण्यासाठीचा प्रयत्न आहे. शिक्षणातून समाजाच्या उत्तम भविष्यासाठी ही कृतिशील गुंतवणूक असून आम्ही नाशिक राउंड टेबल १०७ आणि नाशिक लेडीज सर्कल ११९ यांच्यात विश्वास ठेवतो असे ते म्हणाले.

देवरे अभियांत्रिकीत उद्योजकता परिचय कार्यशाळेचे आयोजन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात सिव्हिल इंजिनिअरिंग विभागा तर्फे तीन दिवसांच्या उद्योजकता परिचय कार्यशाळेचा (स्टुडंट्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) चा काल डिजिटल क्लास रुम मध्ये शुभारंभ झाला. शनिवारी या कार्यशाळेचा समारोप होणार आहे.

कौशल्य विकास प्रशिक्षक श्री मिलिंद पवार तीन दिवसांच्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना उद्योजकते विषयी मार्गदर्शन करीत आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील व सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा सौ संगीता अग्रवाल यांनी श्री मिलिंद पवार यांचे महाविद्यालयात स्वागत केले. प्रा सौ संगीता अग्रवाल यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेचे प्रयोजन मांडले. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना उद्योजक कसे बनायचे, उद्योजक घडताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणी, मार्केट चा अभ्यास, व विक्री कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, उद्योजक होण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, जेष्ठ व अनुभवी उद्योजकांचे मार्गदर्शन आदी महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे. या कार्यशाळेत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

कृषी उत्पन्न बाजारसमितीत मतदार जनजागृती कार्यक्रम

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मतदार जनजागृती कार्यक्रमांनुसार कृषी उत्पन्न बाजारसमिती येथे मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी धुळे शहर मतदारसंघाच्या सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सीमा अहिरे, अपर तहसिलदार वैशाली हिंगे, स्वीप नोडल अधिकारी तथा नायब तहसिलदार मनोज जमदाडे यावेळी शाहीर सुभाष कुलकर्णी यांनी अहिराणी गीताच्या माध्यमातून मतदाराचे प्रबोधन कार्यक्रम सादर करुन मतदानासाठी आवाहन करण्यात आले. यावेळी संरक्षण अधिकारी राकेश नेरकर, संदीप मोरे उपस्थित होते. येत्या २० मे २०२४ होणाऱ्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत नागरिकांनी जास्तीत जास्त मतदान करुन आपला मतदानाचा हक्क बजावावा, त्याचप्रमाणे मतदारांनी कोणत्याही अमिषाला बळी न पडण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत असल्याचे स्वीप नोडल अधिकारी तथा परिविक्षाधिन नायब तहसिलदार मनोज जमदाडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

सायबर सुरक्षा अत्यंत महत्वाची : ॲड. ठाकरे

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विधी महाविद्यालयात सायबर सुरक्षा या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मविप्र सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

ॲड. नितीन ठाकरे यांनी यावेळी बोलतांनाआज आपण डिजिटल युगात आहोत, पूर्वीपेक्षा जास्त तंत्रज्ञानावर आपले जीवन अवलंबून आहे, त्यामुळे सायबर सुरक्षेचे महत्त्व देखील वाढत आहे. आपल्या जीवनातील भरपूर गोष्टी या मोबाईल, संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि सॉफ्टवेअर यांवर अवलंबून आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षा अत्यंत महत्वाची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रासाठी व्याख्याते विकास नाईक यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कायदेशीर तरतुदी यांतील अंतर्गत समस्या आणि दायित्व या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रासाठी प्रमुख स्वाती गोरवाडकर यांनी सायबर सुरक्षा आणि आवश्यक कौशल्ये यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या संयोजक म्हणून डॉ. चारुशीला खैरनार व समन्वयक म्हणून डॉ. निवेदिता जाधव यांनी काम पहिले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे संचालक लक्ष्मण लांडगे तसेच शिक्षणाधिकारी डॉ.विलास देशमुख, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.संध्या गडाख तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

सूक्ष्मजीवशास्त्र विषयाची अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळा

शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आर. सी. पटेल. एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभाग आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार द्वितीय वर्ष पदवी सूक्ष्मजीवशास्त्र अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी नुकतेच विद्यापीठस्तरीय एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन सूक्ष्मजीवशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तसेच मुळजी जेठा महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. केतन नारखेडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र पाटील, विभागप्रमुख प्रा. डॉ. संदीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रसंगी जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख तसेच कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. संदीप पाटील यांनी कार्यशाळेच्या उद्दिष्टाबद्दल सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमृता जोशी यांनी केले. या चर्चासत्रात क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव विद्यापिठातील संलग्नित महाविद्यालयातील एकूण ४५ प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, प्रा. डॉ. रवींद्र पाटील, प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. महेश पाटील, प्रा. डॉ. अश्विनी पाटील, प्रा. डॉ. मोहिनी पाटील, प्रा. डॉ. लीना शिरसाठ, प्रा. अश्विनी सी. पाटील, प्रा. अमृता जोशी, प्रा. हर्षा परदेशी, प्रा. वर्षा जयस्वाल, संजय मोरे, बन्सीलाल चौधरी, डी. यू. पटेल, मेहुल गुजराथी, लक्षीकांत मोरे, संदेश राजपूत व हंसराज कढरे आदींनी प्रयत्न केले.

क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे ६ व ७ एप्रिलला 'रिजनल प्रॉपर्टी महोत्सव'

नाशिकमध्ये २ दिवस ५ विविध ठिकाणी गृह प्रदर्शन

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आपले स्वत:चे घरकुल असणे हे सर्वसामान्यांचे स्वप्न असते. तसेच गुंतवणुकीचा उत्तम पर्याय म्हणून देखील रिअल इस्टेट क्षेत्राकडे बघितले जाते. बांधकाम व्यवसायात सुसूत्रता आणण्याचे काम करणारी बांधकाम व्यावसायिकांची देशातील सर्वात मोठी संस्था क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे येत्या ६ व ७ एप्रिल रोजी एका नाविन्यपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील ५ विभिन्न ठिकाणी ६ व ७ एप्रिल या २ दिवशी या 'रिजनल प्रॉपर्टी महोत्सवा' चे आयोजन करण्यात आले असून अशा प्रकारचे प्रदर्शन देशात पहिल्यांदाच होत आहे आणि ते क्रेडाई नाशिक मेट्रोने आयोजित केले आहे. नाशिकच्या शैक्षणिक व औद्योगिक प्रगतीमुळे नाशिक जिल्हा तसेच उत्तर महाराष्ट्रामधील अनेकांचा ओढा नाशिककडे असतो. त्यामुळे नाशिकमध्ये आपले घर असावे अशी अनेकांची इच्छा असते. त्याचप्रमाणे वाढत्या पारिवारिक गरजांमुळे मोठे घर घेण्याकडे देखील अनेकांचा कल असल्याचे कृणाल पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी उपस्थित क्रेडाई नाशिक मेट्रोचे मानद सचिव गौरव ठक्कर म्हणाले की, वाढत्या शहरानुसार शहराच्या चहुबाजूला विकासाची कामे सुरु असून अनेक नवनवीन प्रकल्प साकारत आहेत. शहरातील पसंतीच्या भागात फ्लॅट, रो-हाउस, शॉप्स घेण्यासाठी अशा प्रकारच्या :रिजनल प्रॉपर्टी महोत्सवा' ने सोयीचे होणार आहे. गुढीपाडवा आणि अक्षय तृतीया हे गृहखरेदीसाठी मोठे मुहूर्त मानले जातात. या दोन्ही सणाच्या आधी भरणारे हे गृह प्रदर्शन या सणासुदीला अनेकांचे गृह स्वप्न पूर्ण करेल असा आशावाद देखील त्यांनी व्यक्त केला . प्रदर्शनाचे समन्वयक म्हणून नरेंद्र कुलकर्णी हे काम पहात आहेत. याप्रसंगी बोलतांना ते म्हणाले, ही ५ प्रदर्शने शहरातील गंगापूर रोड येथील वृन्दावन लॉन्स, दिंडोरी रोडवरील पवार लॉन्स, पंचवटी जवळील स्वामी नारायण हॉल, गोविंदनगर येथील मनोहर गार्डन व नाशिक रोड येथील इच्छामणी लॉन्स येथे होणार आहेत. साधारणता प्रत्येक प्रॉपर्टी महोत्सवाच्या ठिकाणी ४ मी. ४ मी. आणि ३ मी. बाय ३. मी. च्या आकाराचे ३० स्टॉल असून अतिशय वाजवी दरात क्रेडाई नाशिक मेट्रोने उपलब्ध करून दिलेले आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात उन्हाची तीव्रता लक्षात घेता वृंदावन लॉन्स, मनोहर गार्डन, स्वामीनारायण हॉल येथे वातानुकूलित स्टॉलची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सह-समन्वयक सचिन बागड, विजय चव्हाणके, अनंत ठाकरे, सतीश मोरे व शिवम पटेल तसेच उपाध्यक्ष सुजॉय गुप्ता, दीपक बागड, जयंत भातंबरेकर, खजिनदार हितेश पोद्दार, सह-सचिव अनिल आहेर, ऋषिकेश कोते, कमिटी सदस्य मनोज खिवसरा, श्रेणिक सुराणा, हंसराज देशमुख, नितीन पाटील, श्याम साबळे, अतुल शिंदे, सागर शहा, निशित अटल, सुशील बागड, सचिन चव्हाण, तुषार संकलेचा, करण शहा आदी परिश्रम घेत आहेत.

'मेरी आवाज सुनो' जिल्हास्तरीय गायन स्पर्धा

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

गेल्या पिढीतील लोकप्रिय गायक मोहम्मद रफी यांचे यंदा जन्मशताब्दी वर्ष सुरु आहे. त्यानिमित्ताने त्यांनी गाऊन अजरामर केलेल्या गाण्यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. द गोल्डन व्हॉईस स्टुडिओ निर्मित व अफलातून म्युझिक लव्हर्स, सप्तक कलाविष्कार, नाशिक जिल्हा ऑर्केस्ट्रा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच 'मेरी आवाज सुनो' ही स्पर्धा होणार आहे. मोहम्मद रफी यांनी हिंदी चित्रपटसृष्टी गाजवली. अनेक संगीतकारांनी त्यांच्या जादुई आवाजाचा वापर करून रसिकांना सुरेल गाण्यांचा नजराणा दिला. रोटरी क्लब ऑफ नाशिकरोडचे या उपक्रमाला विशेष सहकार्य लाभले आहे. ऑडिशनसाठी ज्ञानेश वर्मा ९६०७०९६३९९, अश्विनी सरदेशमुख ८९९९३६५३०७, सुरेश दिडमिशे ७७७४०८२१२५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे. संयोजन समितीमध्ये गायक संजय अडावदकर, नितीन ठक्कर, अनिल पोटे, उमेश गायकवाड यांचा समावेश आहे. त्यांनी जिल्हाभरातील गायकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.